Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# जागतिक राजकारणात भारताची भूमिका

**डॉ.रमेश जगन्नाथ निकम**
सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग प्रमुख, एस.व्ही.के.टी. महाविद्यालय, देवळाली कॅम्प
**Email:** rjnikam.2017@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171216
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 80-84
December 2025

**Submitted:** 16 Nov. 2025
**Revised:** 26 Nov. 2025
**Accepted:** 11 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***सारांश***

*स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारताने जागतिक राजकारणात एक स्वतंत्र,निरपेक्ष आणि मूल्याधिष्ठित भूमिका बजावली आहे. भारताचे परराष्ट्र धोरण शांतता, सार्वभौमत्व, सहअस्तित्व आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या मानवतावादी आधारित राहिले आहे. या संशोधन प्रबंधामध्ये जागतिक राजकारणातील भारताची भूमिका विविध परिमाणांतून अभ्यासली आहे. अलिप्त चळवळीच्या माध्यमातून भारताने शीतयुद्ध काळात कोणत्याही गटाशी संलग्न न होता नवस्वतंत्र राष्ट्रांना एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. संयुक्त राष्ट्र संघटनेत भारताने शांतता मोहिमा, वसाहतवादविरोधी भूमिका, मानवाधिकार आणि जागतिक शांततेच्या संवर्धनात सक्रिय योगदान दिले आहे. आशियाई देशांबरोबर भारताचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक संबंध प्रादेशिक सहकार्य व स्थैर्यास चालना देणारे ठरले आहेत.अण्वस्त्र निर्मितीच्या संदर्भात भारताने आपली भूमिका संरक्षणात्मक आणि किमान प्रतिबंधक क्षमतेपुरती मर्यादित ठेवली असून, जागतिक निःशस्त्रीकरणाला नेहमीच पाठिंबा दिला आहे. CTBT करारासंदर्भात भारताने समताधिष्ठित आणि भेदभावमुक्त अणुकरारांची मागणी करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भारताचा आण्विक सिद्धांत 'No First Use' आणि जबाबदार अणुशक्ती या तत्त्वांवर विश्वास आहे.सद्यकालीन जागतिक राजकारणात भारत एक उदयोन्मुख जागतिक शक्ती म्हणून बहुपक्षीय कूटनीती, आर्थिक सहकार्य, सामरिक भागीदारी आणि जागतिक प्रश्नांवरील जबाबदार भूमिकेमुळे महत्त्वाचे स्थान प्राप्त करत आहे.*

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्यानंतर पन्नासहून अधिक वर्षांच्या प्रवासानंतर जागतिक राजकारणात भारताची भूमिका परिपक्व झालेली दिसते. आज भारत अनेक महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय आणि विभागीय स्वरूपाच्या आर्थिक आणि राजकीय संघटनांचा सदस्य आहे. संयुक्त राष्ट्र संघटना तसेच विश्व व्यापार संघटनेत भारताने घेतलेल्या भूमिकेला आंतरराष्ट्रीय समुदायाकडून गांभिर्याने घेतले जाते. अमेरिका तसेच इतर पश्चिमी राष्ट्रांकडून प्रचंड दबाव असतानाही भारताने अण्वस्त्र प्रसार बंदी करार (एन.पी.टी.) किंवा सर्वसमावेशक अणुचाचणीबंदी करारावर स्वाक्षरी केलेली नाही.मागील चार दशकापासून भारत निशस्त्रीकरणाच्या बाबतीत आपल्या भूमिकेवर ठाम आहे. असे असतानाही अमेरिका आणि युरोपियन संघाबरोबर भारताचे आर्थिक आणि व्यापारी संबंध वृद्धिंगत होताना दिसत आहेत. १९९० च्या दशकात अमेरिका आणि पश्चिमी राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा धोका वाढल्यापासून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात भारताचे महत्त्व अचानक वाढले आहे.

बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारताने आपली धोरणे अधिक वास्तववादी, गतिशील आणि बहुपक्षीय सहकार्यावर आधारित केली. संयुक्त राष्ट्र संघटना, G20, BRICS, तसेच जागतिक दक्षिणेचे प्रतिनिधित्व करताना भारताने आर्थिक विकास, दहशतवादविरोध, पर्यावरण संरक्षण आणि जागतिक शांतता या मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली आहे

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.रमेश जगन्नाथ निकम, सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग प्रमुख, एस.व्ही.के.टी. महाविद्यालय, देवळाली कॅम्प*

**How to cite this article:**
*निकम, . रमेश . जगन्नाथ . (2025). जागतिक राजकारणात भारताची भूमिका. Journal of Research and Development, 17(12(A)), 80–84.* https://doi.org/10.5281/zenodo.18184191

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18184191
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

**(अ) भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील मूलभूत तत्वे**

**पंचशील** : पंचशील धोरण भारताच्या भूमिकेचे मुलतत्व आहेत. पंचशील धोरणाचा उल्लेख १९५४ मध्ये झालेल्या भारत-चीन करारात करण्यात आला आहे. पंचशील धोरणात खालील पाच तत्त्वांचा उल्लेख आहे.

(१) परस्पर सार्वभौमत्व आणि भौगोलिक एकात्मतेविषयी आदर

(२) युद्ध आणि आक्रमणाला विरोध

(३) कोणत्याही राष्ट्राने इतरांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे

(४) समानता आणि परस्पर विकास

(५) शांततामय सहजीवन यावर भर

पुढील मुद्यांना आधारभूत मानून मागील सात दशकातील भारताच्या जागतिक राजकारणातील भूमिकेवर प्रकश टाकता येईल.

**१ ) अलिप्ततावादी चळवळ:** अलिप्ततावादी चळवळ या नावाने ओळखली जाणारी 'नाम' (NAM) ही संघटना संयुक्त राष्ट्र संघटनेनंतरची महत्वाची मोठी संघटना आहे. नामची सदस्य संख्या सध्या ११४ एवढी आहे. नामच्या निर्मितीत आणि विकासात भारताचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. याशिवाय सिपुटो, सेन्हो यांसारख्या लष्करी संघटना ह्याच काळात निर्माण झाल्या नव्याने स्वतंत्र झालेल्या अफ्रो-आशियाई राष्ट्रांना, ज्यातील बुहसंशय देश गरीब होते. आपल्या आर्थिक विकासासाठी ध्रुवीकरणाच्या राजकारणात पडणे धोक्याचे होते. त्यापेक्षा स्वतंत्र अस्तित्व जोपासून आपला सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकास साधणे आवश्यक असल्याचा विचार भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडला. ह्या विचाराचे मोठे स्वागत आशियाई आफ्रिकी राष्ट्रांमध्ये झाले. विशेषतः युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो, इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्णो, इजिप्तचे अध्यक्ष कर्नल नासेर यांनी ही कल्पना उचलून धरली. ह्या समविचारी नेत्यांची एक परिषद १९५५ साली बांग इथे झाली आणि ह्याच परिषदेत वैचारिक पातळीवर गटनिरपेक्ष चळवीचा प्रारंभझाला. इ.स. १९६१ साली ओो आशियाई राष्ट्रांच्या बेलग्रेड इथे झालेल्या परिषदेत गटनिरपेक्ष बजवळ औपचारिकरित्या अस्तित्वात आली. शीतयुद्धाच्या राजकारणापासून दूर राहून अमेरिका आणि सोव्हिएट युनियन ह्या दोन्ही राष्ट्रांशी मैत्रिपूर्ण संबंध प्रस्थापित करणे तसेच जागतिक शांतता, सहकार्य, निशस्त्रीकरण, गरिबी निर्मूलन, साक्षरता, स्वातंत्र्य यासाठी सामूहिक प्रयत्न करणे ही गटनिरपेक्ष चवीची मुख्य उदिष्ट होती. दर तीन वर्षांनी गटनिरपेक्ष राष्ट्रांची परिषद होते. अलिप्ततावादी चळवळीच्या उदयापासून आतापर्यंत (२००१) तेरा परिषदा झाल्या आहेत. नामच्या व्यासपीठावरून दक्षिण आफ्रिकेमधील वांशिक भेदाभेद (apartheid), वंशवाद,नववसाहतवाद, नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणाली (New International Economic Order) यांसारखे विषय मुख्यत्वे चर्चिले गेले. विकसनशील राष्ट्रांचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी उत्तर दक्षिण आर्थिक संवाद (North-South dialogue) अधिक सुसंगत व्हावा,१९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठे बदल घडून आले, सोव्हिएट संघाच्या विघटनाबरोबरच शीतयुद्धाचे राजकारण, आंतरराष्ट्रीय राजकारणातील ध्रुवीकरण संपुष्टात आले. काही आशियाई राष्ट्रांनी एवढी आर्थिक प्रगती केली की त्यांना विकसनशील म्हणणे योग्य ठरणार नाही. (यात जपान आणि इतर काही दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांचा समावेश होतो. जे एशियन टायगर्स म्हणून ओळखले जातात) विभागीय आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी काही लहान मोठ्या आर्थिक संघटना आफ्रिका आशिया खंडात निर्माण झाल्या. उदाहरणार्थ, अपेक, असियान, सार्क ह्या संघटनांच्या निर्मितीमुळे संघटनात्मक पातळीवरील स्पर्धेच्या एका नव्या युगाला प्रारंभझाला. ह्या स्पर्धेमुळे आणि असमान आर्थिक विकासामुळे आफ्रो-आशियाई राष्ट्रांमध्ये वैचारिक पातळीवर सामूहिकतेची जी भावना १९७०, १९८० च्या दशकात पाहायला मिळाली ती १९९० च्या दशकात बऱ्याच प्रमाणात कमी झाली. अशा वातावरणात अलिप्ततावादी चळवळीच्या भविष्याविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले. हीचळवळ प्रामुख्याने शीतयुद्धकालीन राजकारणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झाली असल्यामुळे शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबर अलिप्ततावादी चळवळदेखील कालबाह्य झाली आहे असा एक विचारप्रवाह पुढे आला आणि एका नवीन वादाला सुरुवात झाली.

**संयुक्त राष्ट्र संघटना: भारताची भूमिका :** संयुक्त राष्ट्र संघटनेच्या निर्मितीपासूनच भारतमुनरोधा सदस्य आहे. तेव्हापासून तर आजपर्यंत पाच दशकांहून अधिक काळापर्यंत भारताने संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या त्यांचे केवळ पालनच केले नाही तर युनोच्या विविध आघाडयांवर महत्वपूर्ण भूमिका बजावली. भारताच्या जागतिक राजकारणातील भूमिकेचे जे आधारस्तंभ आपण अभ्यासले ते आधारस्तंभ संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तत्त्वांना धरूनच आखण्यात आले आहेत. भारताने ह्या आधारतत्वांचे कधीही उल्लंघन केलेले नाही. संयुक्त राष्ट्र संघटनेत भारताची सध्याची भूमिका ही सक्रिय, जबाबदार आणि प्रभावी स्वरूपाची आहे. भारत हा संयुक्त राष्ट्र संघटनेचा संस्थापक सदस्य असून जागतिक शांतता, सुरक्षितता आणि सहकार्य वाढवण्यासाठी तो सातत्याने योगदान देत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता सेनेत (Peacekeeping Operations) भारत हा प्रमुख योगदानकर्त्या देशांपैकी एक असून अनेक संघर्षग्रस्त देशांमध्ये भारतीय सैन्याने शांतता प्रस्थापनेसाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दहशतवादविरोध, मानवाधिकारांचे संरक्षण, हवामान बदल, शाश्वत विकास आणि जागतिक आरोग्य या विषयांवर भारताने ठाम आणि संतुलित भूमिका घेतली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

**आफ्रो-आशियाई राष्ट्रांचे आर्थिक आणि राजकीय:** हितसंबंध जोपासण्यासाठी भारतात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यासपीठाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. वसाहतवादाच्या शोषणावर आधारित जाळयातून आको-आशियाई राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न असो किंवा दक्षिण अफ्रिकेतील वंशभेदाचा प्रश्न असो, भारतात ह्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. विकसनशील राष्ट्रांचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक रचनेच्या (New International Economic Order) अंमलबजावणीसाठी भारताने केलेले प्रयत्न महत्वाचे आहेत. निशस्त्रीकरणासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेत केलेल्या प्रत्येक प्रयत्नाला भारताचे समर्थन आहे आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताने आफ्रो–आशियाई राष्ट्रांचे प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटना व इतर बहुपक्षीय मंचांवर प्रभावीपणे मांडले असून त्यामुळे भारत हा या राष्ट्रांचा विश्वासार्ह भागीदार आणि नैसर्गिक नेता म्हणून उदयास आला आहे.

**दक्षिण आशियाई विभागीय सहकार्य संघटना आणि भारताची भूमिका:** दक्षिण आशियाई सहकार्य संघटनेच्या निर्मितीथी कल्पना बांगलादेशाचे अध्यक्ष झिया उर रहमान यांनी १९८० साली माडली. दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्राची आर्थिक संघटना आसियानच्या धर्तीवर दक्षिण आशियामध्ये समान आर्थिक समस्या सोडवण्यासाठी, परस्पर आर्थिक सहकार्यासाठी एक संयुक्त व्यासपीठ असावे ह्या विचाराने १९८० च्या दशकाच्या पूर्वार्धात जोर पकडला. सार्कच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती साधणे, सुरक्षा व्यवस्था सुधारणे, दक्षिण आशियाई राष्ट्रांना ज्या समान समस्यांचा सामना करावा लागत आहे. ह्या क्षेत्रातील ८० टक्के लोकसंख्या ही दारिद्र्यरेषेखाली आहे. जागतिक अर्थव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्या तुलनते सार्क देशांची अर्थव्यवस्था बघितली तर श्रीमंत-गरिबीची दरी तात्काळ लक्षात येते. सार्कमध्ये सर्वच दृष्टीने भारताचे स्थान मोठे आहे. भारताच्या तुलनेत भूतान, नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान ह्या देशांची आर्थिक परिस्थिती फारच वाईट आहे. श्रीलंकेमधील वाढता वंशवादी कलह, पाकिस्तानमधील धार्मिक कट्टरवादाचे आणि दशहतवादाचे वाढते प्रश्न, नेपाळमधील माओवादी चळवळी ह्या समस्यांची आर्थिक बाजू महत्त्वाची आहे. गरिबी आणि बेकारीमुळे ह्या समस्या वृद्धिंगत झाल्या आहेत.

**असियान आणि भारत :** दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची सहकार्य संघटना म्हणजे असियानची स्थापना १९६७ साली झाली. असियानच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करणे, आर्थिक सहकार्य टिकविण्याच्या दिशेने संयुक्त प्रयत्न करणे, सदस्य राष्ट्रांमधील साधनसंपत्तीचा संयुक्तिक वापर हा होता. स्थापनेच्या वेळी असियानचे पाच सदस्य होते. आता असियानची एकूण सदस्यसंख्या दहा एवढी आहे. सदस्यत्व मिळालेला म्यानमार हा शेवटचा देश आहे. आर्थिक सहकार्याबरोबरच विभागीय संरक्षणाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी असियानच्या अंतर्गतच असियान रिजनल फोरम (ARF) नावाचे एक व्यासपीठ तयार केले गेले. गेल्या अनेक वर्षापासून भारत असिवानचे सदस्यत्व मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. भारताला यात काही प्रमाणात यश मिळालेले असून भारताला विभागीय सहकाऱ्याचा (Sectoral Dialogue Partner) दर्जा देण्यात आला आहे. भारताचा असियानशी व्यापार हा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असून अमेरिका आणि युरोपीय संघानंतर असियानचा भारताशी व्यापार तिसऱ्या क्रमांकावर येतो. काही वर्षांपूर्वी भारताने लुक इस्ट (Look East) नावाचे धोरण स्वीकारून असियानशी व्यापारी संबंध धनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अण्वस्त्र सज्जतेतील राजकीय भूमिका :** भारत आता अण्वस्त्र संपन्न देश बनला आहे. ११ मे १९९८ ला भारताने राजस्थानमधील पोखरण इथे दुसऱ्यांदा अणुचाचणी केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १२ मे ला स्वतःला अण्वस्त्र क्षमता असलेला देश म्हणून घोषित केले. अशा प्रकारे अण्वस्त्र विकासाची क्षमता असलेला आणि स्वतःला अण्वस्त्र संपन्न देश म्हणून घोषित करणारा भारत जगातील सहावा देश आहे. यापूर्वी अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीनने स्वतःला अण्वस्त्र संपन्न म्हणून घोषित केले होते. ह्या पाचही अण्वस्त्र संपन्न राष्ट्रांची अण्वस्त्रांचा विकास करण्यामागे विशिष्ट अशी राजकीय भूमिका आहे. भारताचीही स्वतःला अण्वस्त्र सज्ज म्हणून घोषित करण्यामागे विशिष्ट राजकीय भूमिका आहे.

**अण्वस्त्र सज्जतेमागील भारताची राजकीय भूमिका :** अणुशक्तीबाबत भारताची राजकीय भूमिका स्वातंत्र्यानंतर लगेचच स्पष्ट करण्यात आली होती. भारताचा अणुशक्ती विकासाचा कार्यक्रम हा केवळ शांतता आणि विधायक कामासाठी असेल, असे भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी सुरुवातीलाच स्पष्ट केले होते.अण्वस्त्रांच्या विध्वंसक परिणामांची जाणीव भारताला होती म्हणूनच सुरुवातीपासूनच भारतात अण्वस्त्रमुक्त जगाच्या निर्मितीसाठी प्रयत्न सुरू केले होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत १९ नोव्हेंबर १९६५ रोजी सर्वानुमते निशस्त्रीकरणाचा आणि अण्वस्त्रांच्या समूळ उच्चाटनाचा निर्णय मंजूर केला. ह्याच निर्णयाच्या आधारावर १९६८ साली अण्वस्त्र प्रसारबंदीचा करार (Nuclear Non-Proliferation Treaty) करार करण्यात आला. भारत १९६५ साली आमसभेने घेतलेल्या निर्णयाशी पूर्ण सहमत होता. पण १९६८ च्या करारावर मात्र भारताने स्वाक्षरी करण्याचे नाकारले.

१९६८ चा अण्वस्त्रप्रसार बंदी करार हा पूर्णतः पक्षपाती होता. या कराराने जगाची विभागणी अण्वस्त्र असलेले देश आणि अण्वस्त्र नसलेले देश अशा दोन गटांत केली. १९६८ पर्यंत पाच राष्ट्रांकडे अशी अण्वस्त्र संपन्नता होती. ते देश होते अमेरिका, सोव्हिएट रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने संपूर्ण निशस्त्रीकरणाचा ठराव मंजूर केला होता. आणि हे उद्दिष्ट अण्वस्त्र प्रसारबंदी करारामार्फत पूर्ण होणार नव्हते. या करारात अशी पक्षपाती व्यवस्था निर्माण केली की ज्यात विशिष्ट राष्ट्रांची अण्वस्त्र

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

हुकुमशाही (Nuclear Hegemony) असेल. या कराराच्या पक्षपाती स्वरूपामुळे केवळ ४३ देशांनीच हा करार मान्य केला. अण्वस्त्र प्रसारबंदी करार ५ मार्च १९७० साली अस्तित्वात आला. या कराराची मुदत १९९५ साली संपली. परिणामी ह्या कराराला अनिश्चित काळापर्यंत मुदतवाढ देण्यासाठी १९९५ साली प्रयत्न झाले. अमेरिकेच्या दहशतीच्या राजकारणामुळे अनेक राष्ट्रांनी इच्छा नसतानाही मुदतवाढीला मान्यता दिली. पण भारत आपल्या भूमिकेवर कायम राहिला आणि ही भूमिका होती-जोपर्यंत अण्वस्त्रांच्या समूळ उच्चाटनाचे वेळापत्रक ठरवले जात नाही आणि ह्या करारातला पक्षपातीपणा दूर करून संपूर्ण निशस्त्रीकरण्याच्या दिशेने अण्वस्त्र संपन्न देश प्रयत्न करत नाहीत तोपर्यंत भारत हा करार मान्य करणार नाही. पाच अनु वस्त्र संपन्न देशांची अन्वस्त्रांवरील मक्तेदारी कायम ठेवून इतर राष्ट्रांना ही क्षमता प्राप्त करण्यापासून दूर ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वकांक्षी प्रयत्न 1995 मध्ये झाला. सिटी बीपी करार जवळ अस्तित्वात येईल तेव्हापासून कोणत्याही राष्ट्राला अणुचाचणी करता येणार नाही या करारामध्ये सध्या अमेरिका रशिया फ्रान्स इंग्लंड आणि चीनकडे अस्तित्वात असणाऱ्या अणुसरांना नष्ट करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. हा करार पक्षपाती गोष्टींमुळे भारताने या करारावर ती सह्या करण्याचे अमान्य केले भारताचे आग्रह संपूर्ण यशस्वी करण्याचा आहे. असे भारताने या करारावर स्वाक्षरी न करणे संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली.

**भारताचा अण्वस्त्र धोरण मसुदा :** १२ मे १९९८ ला भारताने स्वतःला अण्वस्त्र संपन्न देश म्हणून घोषित केले. अर्थात, यापूर्वीही भारताकडे अण्वस्त्र विकासाची क्षमता होती आणि भारताने आपला पर्याय मोकळा ठेवला होता. (Open Nuclear Option) याचाच अर्थ असा होतो की जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा भारत अण्वस्त्रांचा विकास करू शकतो. भारताने अण्वस्त्रांची निर्मिती ही प्रामुख्याने दोन कारणांसाठी केली. पहिले कारण म्हणजे दक्षिण आशियामध्ये अण्वस्त्रांचा वाढता प्रसार, चीन आणि पाकिस्तानची अण्वस्त्र सज्जता, त्यांच्यातील सहकार्य याचा भारताच्या संरक्षणावर गंभीर परिणाम होणार होता. दुसरे कारण म्हणजे स्वरक्षण. भारताला अमेरिकेप्रमाणे अण्वस्त्रांचा राजकीय लाभ उठवायचा नाही तर स्वरक्षणाची भूमिका यामागे महत्त्वाची आहे. १७ ऑगस्ट १९९९ ला भारताने आपला अणुशक्ती मसुदा (Nuclear Draft) घोषित केला. ह्या मसुद्यामध्ये अण्वस्त्र सज्जतेमागची भारताची राजकीय भूमिका स्पष्ट होते. ह्या मसुद्याची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) भारताच्या अणुशक्ती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश अणुशक्तीचा विकासात्मक कार्यक्रमासाठी उपयोग करणे हा आहे.

(२) आर्थिक, सामाजिक, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीप्रमाणेच संरक्षण हे क्षेत्रदेखील विकासात्मक
कार्यक्रमाचा भाग आहे. त्यामुळे संरक्षणासाठी अणुशक्तीचा वापर केला जाईल.

(३भारत आपल्या संरक्षणासाठी आवश्यक तेवढी, कमीत-कमी अण्वस्त्र सज्जता प्राप्त करेल यासाठी (Credible minimum Deterrence) हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे.

(४)भारत अण्वस्त्रांचा उपयोग प्रथम करणार नाही (No First Use) जर भारतावर अण्वस्त्रांचा हल्ला झालाच तर प्रतिउत्तर (Retaliatory Capability) म्हणून याचा वापर करेल.

५) अण्वस्त्रांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यावरील नियंत्रणासाठी (Safety and Control) सर्वसमावेशक योजना आणि प्रशिक्षण कार्यक्रमांची आखणी केली जाईल.

## निष्कर्ष (Conclusion)

भारताने जागतिक राजकारणात सातत्याने एक जबाबदार, शांतताप्रिय आणि मूल्याधिष्ठित राष्ट्र म्हणून भूमिका बजावली आहे. अलिप्त चळवळीच्या माध्यमातून भारताने शीतयुद्ध काळात स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची दिशा निश्चित केली आणि नवस्वतंत्र राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले. संयुक्त राष्ट्र संघटनेतील भारताचे सक्रिय योगदान जागतिक शांतता, मानवाधिकार संरक्षण आणि वसाहतवादविरोधी धोरणांना बळकटी देणारे ठरले आहे.

आशियाई देशांशी भारताचे संबंध प्रादेशिक सहकार्य, आर्थिक विकास आणि सामरिक स्थैर्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले आहेत. आण्वस्त्र निर्मितीच्या बाबतीत भारताने संरक्षणात्मक दृष्टिकोन स्वीकारत किमान प्रतिबंधक क्षमतेवर भर दिला असून, जागतिक निःशस्त्रीकरणाच्या मागणीशी आपली भूमिका सुसंगत ठेवली आहे.CTBT कराराबाबत भारताने भेदभावमुक्त आणि सार्वत्रिक अणुकरारांची भूमिका मांडून आपली तत्त्वनिष्ठ परराष्ट्र नीती अधोरेखित केली आहे. तसेच, 'नो फर्स्ट यूज' या तत्त्वावर आधारित भारताचा आण्विक सिद्धांत भारताला एक जबाबदार अणुशक्ती म्हणून ओळख निर्माण करून देतो. सद्यकालीन जागतिक राजकारणात भारत बहुपक्षीय कूटनीती, आर्थिक सामर्थ्य, लोकशाही मूल्ये आणि सामरिक स्वायत्ततेच्या आधारे एक महत्त्वाची उदयोन्मुख जागतिक शक्ती म्हणून पुढे येत आहे. त्यामुळे, जागतिक शांतता, सुरक्षा आणि विकासाच्या प्रक्रियेत भारताची भूमिका भविष्यात अधिक प्रभावी आणि निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. या अभ्यासातून भारताचे परराष्ट्र धोरण केवळ राष्ट्रीय हितसंबंधांपुरते मर्यादित नसून, जागतिक कल्याण आणि स्थैर्याशी निगडित असल्याचे स्पष्ट होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

**संदर्भ**

1. देवळाणकर शैलेन्द्र, (2019), भारताचे परराष्ट्र धोरण : नवीन प्रवाह. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
2. जोगळेकर अनय,(2018),भारताच्या परराष्ट्र धोरणाची विस्तारणारी क्षितिजे. परम मित्र प्रकाशन,पुणे.
3. पाटील, वा. भा. (2016). आंतरराष्ट्रीय संबंध.: विद्या बुक्स, औरंगाबाद.
4. पाटील, वा. भा., भारताचे परराष्ट्र धोरण. प्रशांत पब्लिकेशन.
5. तळवलकर गोविंद, (2015). भारत आणि जग, मौज प्रकाशन गृह,मुंबई.
6. Jaishankar, S. (2020). The India way: Strategies for an uncertain world. Harper Collins India, New Delhi.
7. Bajpai, K. P., & Pant, H. V. (Eds.). (2013). India's foreign policy: A reader. New Delhi: Oxford University Press.